# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे- ४११ ००४.

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५७०५१३१ ते ३३ फॅक्स -०२०-२५६६५८०७

## -: जाहीर प्रकटन :-

पुणे / कोल्हापूर /औरंगाबाद विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) जुलै–ऑगस्ट, २०१९ करिता आपल्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाइन पध्दतीने सादर केल्यानंतर आपल्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे परीक्षा शुल्काचे बॅक ऑफ इंडियाचे चलन ऑनलाईन तयार होणार असून ते आपण डाऊनलोड करून घ्यावयायचे आहे. परीक्षा शुल्क बॅक ऑफ इंडिया मध्ये भरणा करण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्याकडे विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्कापोटी जमा होणारी रक्कम माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या बॅक खात्यामध्ये जमा करावी आणि ऑनलाईन चलन डाऊनलोड केल्यानंतर चलनावर नमूद असलेली रक्कम विहित मुदतीत त्यांच्या त्याच बॅकेच्या खात्यामधून NEFT/RTGS व्दारे चलनावरील नमूद बॅक अकाऊंट नंबर ( Alpha Numeric) व आयएफएससी कोड BKID000MSBP (बीकेआयडी तीन वेळा शून्य एमएसबीपी ) प्रमाणे **मंडळाकडे वर्ग करावयाची आहे.**

माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी एनईएफटी/आरटीजीएस केलेली रक्कम त्यांच्या खात्यातून वजा झाली आहे किंवा नाही तसेच अकाऊंट नंबर व आयएफएससी कोड चुकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली किंवा नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक / प्राचार्य यांची राहील.

तसेच, माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांचे शुल्क मंडळाकडे जमा झाल्याशिवाय त्यावरील पुढील प्रक्रिया होणार नाही याची दक्षता सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी घ्यावयाची आहे.

दिनांक १५/०६/२०१९.

सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

---

क्र.पुविमं/शाखा अ/उ मा/ 3707,
पुणे-४११ ००५.
दि.१८/०६/२०१९

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये, (पुणे, अहमदनगर, सोलापूर).

उपरोक्त राज्यमंडळाच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. सदर माहिती सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या सूचना फलकावर लावून विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

18/6/19

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.